# नियमित दिवाणी मुकदमा क्र. ११८/२०१९ नि.२७ खालील आदेश पारीत दि. ३०/०६/२०२२

१. प्रतिवादी क्र.३ यांनी या अर्जाद्वारे त्यांचेविरुध्द झालेला 'कैफियत नाही' हा आदेश रद्द होवून कैफियत दाखल करण्यास परवानगी मागितलेली आहे. त्यांचे असे कथन आहे की, ते व्यवसायाने डॉक्टर असून कोविड–१९ काळात रुग्णांना सेवा देणेत व्यस्त असलने त्यांना दावा मिळकतीबाबत मुदतीत आवश्यक ती माहिती व महत्वाची कागदपत्र उपलब्ध न झाल्यामुळे कैफियत दाखल करता आली नाही. त्यांची लेखी कैफियत याकामी दाखल न झालेस त्यांच्यावर अन्याय होणार आहे. तसेच दाव्याचा गुणदोषावर निर्णय होणेस अडचण निर्माण होणार आहे. सबब अर्ज मंजूर होण्याची विनंती केली आहे.

२. वादीने प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्जातील मागणीस आक्षेप घेतला आहे. त्यांचे असे कथन आहे की, प्रस्तुतचा अर्ज खोटा व खोडसाळ असून सदरचा अर्ज खर्चासह नांमजूर करणेची विनंती केली आहे.

३. प्रतिवादी क्र. ३ आणि वादी तर्फे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. दाव्याच्या अभिलेखाचे अवलोकन केले.

४. याकामी प्रतिवादी क्र. ३ यांना दिनांक ०९/१२/२०१९ रोजी नि.०८ अन्वये दाव्याचे समन्स तामील झाले आहेत. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ८ नियम १ नुसार प्रतिवादीने समन्स बजावणी झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत त्याची लेखी कैफियत दाखल करणे बंधनकारक आहे. सदरची मुदत समाधानकारक कारणास्तव पुढील ६० दिवसांकरीता वाढविता येते. सदर प्रतिवादीने मुदतीत त्यांची लेखी कैफियत दाखल न केल्याने दि.०७/०३/२०२० रोजी त्यांच्याविरुध्द कैफियत नाही असा आदेश पारीत करण्यात आला आहे. त्यानंतर २ वर्षांनी म्हणजेच दि. ०६/०४/२०२२ रोजी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. मार्च २०२० पासून भारत देशाबरोबर संपूर्ण जगामध्ये कोरोना या संसर्गजन्य आजाराचा प्रादुर्भाव झाला आहे आणि त्यामुळे जिवित हानी होवू नये याकरीता शासनामार्फत तसेच आदरणीय सर्वोच्च न्यायालय आणि मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्यामार्फत दैनंदिन जीवनामध्ये तसेच न्यायालयीन कामकाज चालविण्यामध्ये विविध सूचना प्राप्त असून त्यानुसार

न्यायालयीन कामकाज सुरु आहे. हा दावा वादीने प्रतिवादींविरुध्द हक्कप्रस्थापना होवून मिळण्यासाठी व कायमची ताकीदीसाठी दाखल केला आहे. त्यामुळे सदर प्रतिवादी क्र. ३ यांना याकामी हजर होवून त्यांची लेखी कैफियत दाखल करणेस परवानगी दिलेस दाव्याचा गुणदोषावर निर्णय होण्यास मदत होईल हे स्पष्ट आहे. सबब अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. तथापि वादीला याकामी जो काही त्रास झाला त्या करीता खर्च मंजूर होणे न्यायोचित होईल. या सर्व विवेचनास्तव मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करते.

**<u>–::– आदेश –::–</u>**

१. प्रतिवादी क्र.३ यांचा नि.२७ वरील अर्ज वादीला खर्चादाखल रक्कम रु. ५००/– (रु. पाचशे मात्र) देण्याच्या अटीवर मंजूर करणेत येत आहे.

२. खर्चाची रक्कम पुढील तारखेला वा त्यापूर्वी अदा करावी.

३. खर्चाची रक्कम अदा केल्यानंतर प्रतिवादी क्र.३ यांना त्यांची लेखी कैफियत अभिलेखावर दाखल करण्यास परवानगी देण्यात येते.

RUPALI RAJANIKANT BEDAGKAR
Digitally signed by RUPALI RAJANIKANT BEDAGKAR
Date: 2022.06.30 17:48:55 +0530

(आर.आर.बेडगकर)

दि. ३०/०६/२०२२

दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)

सावंतवाडी.